दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com


बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | मंगळवार दि. २० जानेवारी २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १४७ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Tuesday 20 January 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 147 | Pages 4 | Rate 4 Rs

दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
वादळ वार्ता
RNI/MAHMAR/2023/87555
॥ महाराष्ट्रभर प्रतिनिधी नेमणूक ॥
https://epaper.vadalvarta.com
महाराष्ट्रातील सर्व जिल्हे, तालुके, सर्कल व गावे येथे उत्साही, निर्भीड व समाजभान असलेले प्रतिनिधी नेमायचे आहेत.
पदे: जिल्हा प्रतिनिधी, तालुका प्रतिनिधी, सर्कल प्रतिनिधी, गाव प्रतिनिधी
पात्रता:
- पत्रकारितेची आवड व सामाजिक भान
- स्थानिक प्रश्न मांडण्याची क्षमता
- मोबाईल / डिजिटल माध्यमांचे ज्ञान
- बातमी लेखन व फोटो / व्हिडिओ पाठवण्याची तयारी
- अनुभव नसला तरी चालेल (नवीन उमेदवारांना संधी)
प्रतिनिधींना मिळणाऱ्या सुविधा: दैनिक वादळ वार्ता ओळखपत्र, सामाजिक प्रश्नांना व्यासपीठ, बातम्या प्रसिद्ध करण्याची संधी, पत्रकारितेत नाव व ओळख, पुढील काळात विशेष संधी व जबाबदाऱ्या
विशेष सूचना: निर्भीड, अन्यायाविरोधात आवाज उठवणाऱ्यांना प्राधान्य; ग्रामीण व शहरी भागातील उमेदवारांचे स्वागत
मुख्य संपादक : अजय भांगे | संपर्क | मो.न.9422660077

# वरच्या देवानेच मुंबईत महायुतीचा महापौर करायचा ठरवलंय

## एकनाथ शिंदे आणि आम्ही मिळून नाव ठरवू-देवेंद्र फडणवीस



**देवाच्या मनात असेल, मुंबई आपला महापौर होईल, असे विधान उद्धव ठाकरे यांनी केले होते. यावरून मुख्यमंत्री फडणवीस यांना उद्धव ठाकरेंना टोला लगावला आहे. वरच्या देवाने ठरवले की, महायुतीचा महापौर करायचा आहे. त्यामुळे आमचाच महापौर होईल, असे ते म्हणाले. तसेच महापौर कुणाला करायचे शिंदे आणि आम्ही मिळून ठरवू, असेही त्यांनी स्पष्ट केले.देशातील सर्वात श्रीमंत आणि राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या बृहन्मुंबई महानगरपालिकेवर अखेर २५ वर्षांनंतर ठाकरे कुटुंबाची एकहाती सत्ता संपुष्टात आली आहे. या बहुचर्चित निवडणुकीत भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीने एकूण ११८ जागांसह बहुमताचा ११४ चा आकडा पार करत मुंबई महापालिकेवर वर्चस्व मिळवले आहे. त्यामुळे आता मुंबईचा महापौर महायुतीचाच होणार, हे जवळपास निश्चित मानले जात आहे. मुंबईचा महापौर कुणाला करायचे याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपरोक्त विधान केले. ते आज पुण्यात माध्यमांशी संवाद साधत होते.**

### मनसे ही या निवडणुकीतील 'बिगेस्ट लूझर

**ठाकरे बंधुंच्या युतीमध्ये बिगेस्ट लूझर मनसे राहील, असे मला राजकीयदृष्ट्या दिसत होते. माझे भाकीत या निवडणुकीने स्पष्ट केले आहे. मनसेला किंवा राज ठाकरेंना या युतीचा कुठलाही फायदा झालेला नाही. उद्धवजींना झालेला दिसतोय, असा टोला देवेंद्र फडणवीस यांनी राज ठाकरेंना लगावला.**

### अजितदादा कॅबिनेट बैठकीला गैरहजर का?

**उपमुख्यमंत्री अजित पवार आज मंत्रिमंडळाच्या बैठकीला गैरहजर होते. यावरही देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. मतदानाच्या दिवशी रात्री अजित पवार माझ्याकडे येऊन गेले होते. त्यादिवशीच त्यांनी सांगितले होते की, माझ्याकडे राज्यपाल महोदय येणार आहेत. त्यामुळे मी मंत्रिमंडळाला बैठकीला येऊ शकणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.**

**पुणे । प्रतिनिधी**

देवाच्या मनात असेल, मुंबई आपला महापौर होईल, असे विधान उद्धव ठाकरे यांनी केले होते. याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांना विचारले असता ते म्हणाले, देवाच्या म्हणजे माझ्या की, वरच्या देवाच्या? असा मिश्किल प्रश्न केला. ते पुढे म्हणाले, वरच्या देवाने ठरवले की, महायुतीचा महापौर करायचा आहे. त्यामुळे आमचाच महापौर होईल.मुंबईचा महापौर कोण होणार? कधी होणार? किती वर्षे वाटून घ्यायचे? या सगळ्या गोष्टी शिंदे आणि मी, आणि आमचे दोन्हीकडील नेते मंडळी सगळे बसवून ठरवू. त्यात काही वाद येणार नाही. आम्ही दोन्ही पक्ष छान पद्धतीने मुंबई चालवून दाखवू, असेही देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.मुंबईत भाजप युतीला ११९ जागा मिळालेल्या आहेत. जवळपास आमच्या १४ जागा अतिशय कमी मतांनी हारलो आहोत. एवढ्या जागा एकत्रित शिवसेनेला देखील कधी मिळाल्या नव्हत्या. त्यांच्या तीनही निवडणुकीचा रेकॉर्ड आम्ही तोडलेला आहे. पूर्ण बहुमतामध्ये आम्ही निवडून आलो आहोत. त्यामुळे कोण काय म्हणतं? गिरा तो क्या हुआ, टांग तो उपर थी, असे म्हणणारे खूप लोक असतात. त्यावर फार काही बोलायचे नसते, असा टोला देवेंद्र फडणवीस यांनी संजय राऊत यांना लगावला.शिवसेना शिंदे गटाच्या निवडणुकीतील कामगिरीवरही देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केले. आमच्यासारखेच एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या काही जागा कमी मतांनी गेल्या आहेत. मुंबईत पहिल्यांदाज तेही अशा पद्धतीने निवडणूक लढत होते. त्यामानाने त्यांना चांगले यश आले. अपेक्षा यापेक्षा जास्त होती, पण काही जागा या थोड्या मतांनी गेलेल्या दिसतायत, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## नवनीत राणा यांना जीवे मारण्याची धमकी

**मुंबई-** भाजप नेत्या व माजी खासदार नवनीत राणा यांना पुन्हा एकदा जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. पोलिसांच्या ११२ क्रमांकावर फोन करत बाबा सिद्दिकी सारखीच नवनीत राणा यांची हत्या करू, अशी धमकी देण्यात आली आहे. या प्रकारामुळे एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या पूर्वी देखील नवनीत राणा यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती.हिंदू शेरणी आणि निवडणूक प्रचारादरम्यान हैदराबाद येथील भाषणानंतर नवनीत राणा यांना धमकी देण्यात आली होती. आता पुन्हा एकदा त्यांना फोनवरून धमकी देण्यात आल्याने अमरावती जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

## वादळी कट्टा

आज एका व्यासपीठावर, उद्या दुसऱ्या रांगेत,
कालचा नारा विसरला, स्वार्थ बसला छातीत.
तत्त्वांची बोली लावली, सत्तेचा सौदा झाला,
या पक्षातून त्या पक्षात, नेता सहज फिरून गेला.

सकाळी भगवा, संध्याकाळी हिरवा रंग,
सत्तेच्या वाऱ्यावर बदलतो झेंडा संग.
जनतेला फसवणूक, भाषणात मात्र भार,
या पक्षातून त्या पक्षात, चालतो सत्तेचा व्यापार.

काल ज्याच्यावर टीका, आज त्याच्याच पंगतीत,
स्मृती झाली पुसट, लाभ दिसला नजरेत.
विचारांची उधळण, निष्ठेला लागला दाब,
या पक्षातून त्या पक्षात, राजकारणाचा स्वभाव.

मतदार पाहतो सगळं, हसतो आतल्या आत,
नेते मात्र समजतात, जनता आहे अंधात.
निवडणूक आली की, पुन्हा होईल आरडाओरड,
या पक्षातून त्या पक्षात, हीच कथा वारंवार घडत.

संपादक
अजय भांगे



## मुंबईकरांनी विकासाला स्वीकारले,भावनिकतेला नाकारले-उपमुख्यमंत्री शिंदेंचा ठाकरेंना टोला


दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील महापालिका निवडणुकांमध्ये शिवसेना-भाजप महायुती बहुमताच्या उंबरठ्यावर पोहोचली असून, राज्यभरातील अनेक महापालिकांमध्ये महायुतीचे महापौर होतील, असा ठाम विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.ठाणे, कल्याण-डोंबिवली, संपूर्ण एमएमआर आणि मुंबईत महायुतीने जोरदार मुसंडी मारली असल्याचे त्यांनी सांगितले. ठाण्यात शिवसेनेला स्पष्ट बहुमत मिळाले असून, एमएमआर परिसरातही चांगल्या जागा मिळाल्या आहेत. मुंबईतही शिवसेना-भाजप महायुतीचा महापौर होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. बहुमताच्या अगदी जवळ पोहोचलो असून, राज्यात अनेक ठिकाणी महायुती सत्ता स्थापन करेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, निवडणुकीदरम्यान काही ठिकाणी भावनिक मुद्दे, भ्रष्टाचाराचे आरोप आणि विविध प्रकारचा प्रचार करण्यात आला. मात्र, मुंबईकरांनी आणि राज्यातील मतदारांनी भावनिकतेपेक्षा विकासालाच कौल दिला आहे. विकासविरोधी भूमिका घेणाऱ्यांना जनतेने नाकारले असून, विकास हाच ब्रँड जनतेने स्वीकारला असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने (उबाठा) १५० हून अधिक जागा लढवून सुमारे ६० जागा जिंकल्या, मात्र एकंदरीत जनतेने विकासाच्या अजेंडालाच पाठिंबा दिल्याचे त्यांनी नमूद केले.केंद्रात आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार, राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



यांच्या नेतृत्वाखालील सरकार आणि मुंबई महापालिकेत महायुतीची सत्ता अशा ट्रिपल इंजिन सरकारचा मुंबईला मोठा फायदा होणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. भारत ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करत असताना, त्या प्रवासात मुंबईचा मोठा वाटा असावा, यासाठी विशेष नियोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबईला जागतिक दर्जाचे, जगाला हेवा वाटेल असे आंतरराष्ट्रीय शहर बनवण्याचा आमचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.गेल्या साडेतीन वर्षांत मुंबईसाठी करण्यात आलेल्या आणि सुरू असलेल्या विकासकामांचा आढावा देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, पुढील वर्षी मे महिन्यापर्यंत मुंबईतील सर्व प्रमुख रस्ते कॉंक्रीटचे करण्यात येणार असून, शहर खड्डेमुक्त झाल्याचे नागरिकांना प्रत्यक्ष अनुभवायला मिळेल. मुंबईत सात ठिकाणी सिव्हेरज ट्रीटमेंट प्लांट (एसटीपी) उभारले जात असून, यामुळे प्रदूषणमुक्त मुंबईकडे मोठे पाऊल टाकले जाईल. मेट्रो २, मेट्रो ३ आणि इतर मार्गांचे जाळे पूर्ण करण्यासाठी काम वेगात सुरू असून, पूर्वी रखडलेले प्रकल्प पुन्हा मार्गी लावण्यात आले आहेत.

## जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत ग्रामसेवकांचा रुबाब




दैनिक वादळ वार्ता
**भूम । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीचे रणधुमाळी सुरू झाली आहे.

१६ तारखेपासून अर्ज भरण्याची प्रक्रिया चालू झाली आहे. पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद चा अर्ज भरण्यासाठी ग्रामपंचायतचे बेबाकी प्रमाणपत्र ग्रामसेवकांच्या सहीचे लागत आहे.

बाकी प्रमाणपत्र स्वयं घोषणा आहे. बेबाकी प्रमाणपत्र घेण्यासाठी ग्रामसेवकांना कार्यकर्त्यांना इच्छुक उमेदवारांना फोन लावावा लागत आहे. हॅलो मॅडम हॅलो साहेब कुठे आहेत तुम्ही मला बेबाकी प्रमाणपत्र पाहिजे आहे असे फोन इच्छुक उमेदवारांचे संबंधित ग्रामसेवकांना जातात तेव्हा ग्रामसेवक संबंधित जे कार्यकर्ते उमेदवार आहेत त्यांना सांगतात मी तालुक्याच्या ठिकाणी आहे. आपल्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्याला फोन लावा आणि त्याच्याकडून तुमच्याकडे किती बेबाकी आहे ते एका कागदावर लिहून आणा असे सांगितले जाते. परंतु संबंधित ग्रामपंचायतचे कर्मचार्यांला फोन लावल्यास म्हणतात की आमच्याकडे चावी नाही ग्रामसेवकाकडे आहे आमच्या घरी कार्यक्रम आहे मी शेतात आहे अशी उत्तरे संबंधित इच्छुक उमेदवारांना मिळतात. आणि परत ग्रामसेवकांना फोन केल्यास मी करतो कर्मचाऱ्यांला फोन संबंधित कर्मचाऱ्याला फोन लावून बाकी विचारून घेतो आणि म्हणतो तुम्ही या तालुक्याच्या ठिकाणी या प्रमाणपत्र घेऊन जावा असे सांगितले जात आहे. संबंधित ग्रामसेवक हे त्या गावच्या सज्जावर न थांबता तालुक्याच्या ठिकाणी थांबून यामध्ये त्यांचा रुबाब दिसून येत आहे.

## नदीपात्रावरील चोले पेंड येथे तीन तराफे जाळले

दैनिक वादळ वार्ता
**किनवट। प्रतिनिधी**

माहूरचे तहसीलदार आणि पोलीस निरीक्षक निवडणूक कामात व्यस्त असल्याचा फायदा घेऊन पैनगंगा नदी पत्रावरील कु प्रसिद्ध चोले पेंड काळे पेंड येथून मोठ्या प्रमाणात वाळू तस्करी सुरू असल्याची माहिती मिळाल्याने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोन्तूला यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार अभिजीत जगताप यांनी महसूल पथकास या ठिकाणी पाठविले असता ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी संयुक्त कारवाई करत तीन तराफे जाळून नष्ट केल्याची घटना १ वाजता घडली आहे

माहूर शहरासह तालुका भरातील प्रत्येक गावात वाळू तस्करांनी मनमानी पद्धतीने दर आकारून वाळू पुरवठा सुरू केला असून विदर्भातील काही पेंडाच्या पावत्या दाखवूत वाळू तस्करी दिवस-रात्र सुरू असून शहरातील काही ठिकाणी चोरीची वाळू आणताना वाळूच्या वाहनासोबत बॉडीगार्ड बाऊन्सर च्या गाड्या पळवून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्नही सुरू आहे

वाळू तस्कराकडून नुकतीच एका पत्रकाराला मारहाण झाल्याची घटना माहूर शहरात घडल्याने दहशत पसरली असून बाई बाजार वानोळा कुपटी परिसरासह माहूर शहरात वाळू तस्करांनी उच्छाद मांडल्याने तहसीलदार अभिजीत जगताप नायब तहसीलदार कैलास जेठे यांनी स्पेशल



पथकाची नेमणूक केली यांना चोले पेंड येथे नदीपात्रातून वाळू चोरी करण्यासाठी तराफे आणल्याची माहिती मिळाल्याने येथे ग्राम महसूल अधिकारी साहेबराव गावंडे शीतल ढाकुलकर ममता गेडाम उषा देवतळे ज्योती दुर्योधन महसूल सेवक दीपक लोखंडे त्यांना पाठवून चौकशी करण्याचे आदेश दिले त्यांनी पाहणी केली असता त्यांना येथे तीन तराफे आढळून आले त्यामुळे नदीपात्रात जाऊन तीन तराफे नदी काठावर जमा करून तराफे जाळून टाकण्यात आले तसेच नदीपात्रावर जाणारा रस्ता खोदून काढणार असल्याचे तहसीलदार अभिजीत जगताप नायब तहसीलदार कैलास जेठे यांनी सांगितलेमाहूर तालुक्याला वळसा घालून गेलेल्या पैनगंगा नदीमध्ये जाण्यासाठी वाळू तस्करांनी अनेक रस्ते बनविले असून तडीपार गावगुंड यादीतील मान्यवर मंडळीचा वाळू तस्करीच्या धंद्यात शिरकाव झाल्याने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीत चंद्रा दोन्तूला यांनी माहूर तहसील कार्यालयाला आणखी एक वाहन आणि अग्नी शस्त्र तात्काळ पुरवावे अशी मागणी होत आहे

# संपादकीय

## आता कसोटी अपेक्षापूर्तींची

मुंबईकरांना फक्त इतकंच हवं असतं – आयुष्य थोडं तरी सोपं व्हावं. सकाळी कामावर जाताना अडचण नको, पाणी-वीज वेळेवर मिळावं, आजारी पडलो तर चांगला इलाज मिळावा, मुलांना नीट शिक्षण मिळावं आणि शहरात सुरक्षितपणे, सन्मानाने जगता यावं. सत्तेत आलेल्यांनी हे करून दाखवलं, तरच लोक मनापासून म्हणतील – 'आमचं मत खरंच कामी आलं'

अखेर नऊ वर्षांनंतर का होईना मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका झाल्या. महानगरपालिका निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर शहरात वेगळीच हवा तयार होते. कोण जिंकलं, कोण हरलं, कोण सत्तेत आलं – यावर चर्चा तर होतेच, पण त्याहून जास्त चर्चा होते ती सामान्य माणसाच्या अपेक्षांची. कारण ही निवडणूक म्हणजे फक्त राजकीय पक्षांचा खेळ नाही, तर आपल्या रोजच्या आयुष्याशी थेट जोडलेली गोष्ट आहे. आपण चालतो ते रस्ते, आपण पितो ते पाणी, आपण प्रवास करतो ती बस, रुग्ण जातो ते रुग्णालय, मुलं जातात ती शाळा – हे सगळं पालिकेवर अवलंबून असतं. त्यामुळे निकाल लागल्यानंतर लोकांच्या मनात आनंद, आशा, अपेक्षा आणि थोडी भीती – अशा सगळ्या भावना एकत्र येतात.सगळ्यात आधी लोकांना वाटतं,'आपण दिलेलं मत वाया गेलं नाही.' मतदानाच्या दिवशी रांगेत उभं राहून, ऊन-पावसाची तमा न बाळगता दिलेलं मत आता कुणाच्या तरी हातात सत्ता देतं, ही जाणीव लोकांना समाधान देते. प्रचारात उमेदवारांनी आणि पक्षांनी जी वचने दिली, ती आता तरी पूर्ण होतील, अशी आशा सगळ्यांच्या मनात असते. आपल्या भागातले खड्डे बुजतील, रस्ते नीट होतील, पाणी वेळेवर येईल, कचरा रोज उचलला जाईल, असं साधं-सोपं जगणं लोकांना हवं असतं.पावसाळ्यात रस्त्यावर पाणी साचू नये, घरात पाणी घुसू नये, गटारं तुंबू नयेत, दुर्गंधी कमी व्हावी ही सामान्य माणसाची सगळ्यात मोठी अपेक्षा असते. आजारी पडलो तर जवळच दवाखाना असावा, तिथे डॉक्टर मिळावा, औषध मिळावं, रांगेत तासन्तास उभं राहावं लागू नये, असं त्यांना वाटतं. शाळेत शिक्षक वेळेवर यावेत, मुलांना चांगलं शिक्षण मिळावं, शाळा स्वच्छ असावी, चांगल्या पद्धतीचे शिक्षण घेऊन एक चांगली पिढी तयार व्हावी एवढंच त्यांना हवं असतं.झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांसाठी निवडणूक म्हणजे आयुष्य बदलण्याची आशा असते. पक्कं घर, नळाचं पाणी, शौचालय, वीज, ड्रेनेज, कचरा उचलण्याची नीट सोय हे सगळं त्यांना फार महत्त्वाचं वाटतं. योजना जाहीर होतात, पण त्या प्रत्यक्षात याव्यात, फक्त कागदावरच राहू नयेत, अशी त्यांची इच्छा असते. पुनर्वसन करताना लोकांना त्रास न होता, सन्मानाने घर मिळावं, अशी त्यांची अपेक्षा असते.तरुण मुलं-मुलींना नोकरीची, कामधंद्याची, शिकण्याच्या संधींची फार अपेक्षा असते. शहरात ट्रेन-बस नीट चालाव्यात, गर्दी कमी व्हावी, प्रवास थोडा तरी सोपा व्हावा, असं त्यांना वाटतं. सरकारी कामं ऑनलाइन सोपी व्हावीत, प्रमाणपत्र, परवाना, जन्मदाखले , मृत्यू प्रमाणपत्र , कर यासाठी ऑफिसात चकरा माराव्या लागू नयेत, अशी त्यांची इच्छा असते. शहर आधुनिक व्हावं, पण त्याचा फायदा फक्त श्रीमंतांनाच नाही, तर सामान्य माणसालाही व्हावा, हीच त्यांची खरी अपेक्षा असते.महिलांना सगळ्यात जास्त हवं असतं ते म्हणजे सुरक्षितता. रस्त्यावर दिवे असावेत, बस-रेल्वेत सुरक्षित वाटावं, रात्री उशिरा घरी जाताना भीती वाटू नये, असं त्यांना वाटतं. सार्वजनिक शौचालय स्वच्छ असावीत, दवाखान्यात महिलांसाठी नीट सोय असावी, गरोदर महिलांची नीट काळजी घेतली जावी, अशी त्यांची अपेक्षा असते. महिलांना कामधंद्याच्या संधी मिळाव्यात, प्रशिक्षण मिळावं, स्वतःच्या पायावर उभं राहता यावं, हीसुद्धा मोठी अपेक्षा असते. वृद्ध लोकांना शांत आणि सुरक्षित आयुष्य हवं असतं. चालायला चांगले रस्ते, बसायला बाक, बागा, मोफत किंवा स्वस्त औषधं, सरकारी दवाखान्यात नीट इलाज एवढंच त्यांना पुरेसं वाटतं. त्यांच्याशी आदरानं वागलं जावं, कुठल्याही कामासाठी त्यांना हेलपाटे मारावे लागू नयेत, असं त्यांना वाटतं.दुकानदार, छोटे व्यावसायिक, फेरीवाले यांनाही पालिकेकडून खूप अपेक्षा असतात. कर प्रणाली सोपी असावी, दंड उगाच लावू नये, लायसन्स पटकन मिळावं, बाजार स्वच्छ आणि नीटनेटका असावा, असं त्यांना वाटतं. ग्राहक येण्यासाठी रस्ता, लाईट, पार्किंग यांची सोय चांगली असावी, अशी त्यांची अपेक्षा असते. पण एवढ्या सगळ्या अपेक्षांबरोबरच लोकांच्या मनात थोडी भीती आणि शंका असतेच. 'निवडणुकीत जे बोलले, ते खरंच करतील का?' 'फक्त भाषणच राहील की काम होईल?' 'भ्रष्टाचार कमी होईल का?' असे प्रश्न लोक स्वतःलाच विचारतात. आधीही अनेक वेळा मोठी वचने दिली गेली, पण सगळी पूर्ण झालीच असं नाही. म्हणून आता लोक म्हणतात – आम्हाला मोठी भाषणं नकोत, आम्हाला काम करून दाखवा.आज लोक जास्त जागरूक झाले आहेत. सोशल मीडियावर फोटो टाकून रस्त्याचे खड्डे दाखवतात, कचऱ्याचे ढीग दाखवतात, पाण्याच्या समस्यांबद्दल लिहितात. चुकीचं वाटलं तर आवाज उठवतात. त्यामुळे सत्तेत बसलेल्यांवर आता जास्त दबाव असतो.शेवटी मुंबईकरांना फार अवघड काही नको असतं. त्यांना फक्त इतकंच हवं असतं – आयुष्य थोडं तरी सोपं व्हावं. सकाळी कामावर जाताना अडचण नको, पाणी-वीज वेळेवर मिळावं, आजारी पडलो तर चांगला इलाज मिळावा, मुलांना नीट शिक्षण मिळावं, आणि शहरात सुरक्षितपणे, सन्मानाने जगता यावं. सत्तेत आलेल्यांनी हे करून दाखवलं, तरच लोक मनापासून म्हणतील – आमचं मत खरंच कामी आलं. मात्र हे खरं होईल का नाही ते येणारा काळच ठरवेल!

# चिरनेर जिल्हा परिषद निवडणूक समाधान म्हात्रे पूर्ण ताकदीनीशी लढणार

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण । प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्या निवडणुका संपल्यानंतर आता सर्वांना जिल्हा परिषद,पंचायत समितीचे वेध लागले असून जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक ५ फेब्रुवारी २०२६ रोजी तर निकाल ७ फेब्रुवारी २०२६ रोजी लागणार आहेत. निवडणुकांची तारीख जवळ आल्याने सर्वच पक्षात जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य पदासाठी रस्सीखेच चालू असून उरण तालुक्यात चिरनेर जिल्हा परिषद सदस्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (श्री.शरदचंद्र पवार पक्ष)चे एकनिष्ठ कट्टर प्रामाणिक कार्यकर्ते गोवठने गावचे सुपुत्र समाधान गुरुनाथ म्हात्रे यांनी दंड थोपटले असून चिरनेर जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी समाधान गुरुनाथ म्हात्रे हे राष्ट्रवादीकडून पूर्ण ताकदीने निवडणूक रिंगणात उतरणार आहेत.

गाव अध्यक्ष, पूर्व विभाग अध्यक्ष, उरण तालुका युवक अध्यक्ष, जिल्हा युवक उपाध्यक्ष, जिल्हा कार्याध्यक्ष असे अनेक पदे समाधान म्हात्रे यांनी भूषवले असून सध्या ते जिल्हा युवक अध्यक्ष पदावर कार्यरत आहेत. समाधान म्हात्रे यांनी गोवठने ग्रामपंचायत सदस्य, उपसरपंच म्हणूनही उत्तमपणे पदभार सांभाळला आहे.उरणचे नगराध्यक्ष भावनाताई घाणेकर यांचे ते कट्टर समर्थक आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ते कट्टर एकनिष्ठ प्रामाणिक कार्यकर्ते आहेत. २०१४ साली त्यांनी पंचायत समितीचे तिकीट मागितले होते त्यावेळी आय काँग्रेस व राष्ट्रवादीची आघाडी असल्यामुळे तिकीट मिळाले नाही. परत त्यांनी २०१९ ला तिकीट मागितले असता शेकाप व राष्ट्रवादीची आघाडी झाली असल्याने शेकापला तिकीट गेल्याने समाधान म्हात्रे यांची संधी हुकली.त्यांना पंचायत समितीचे सदस्य किंवा जिल्हा परिषद सदस्य बनता आले नाही.आता मात्र २०२६ मध्ये समाधान म्हात्रे यांनी चिरनेर जिल्हा परिषद सदस्याची निवडणूक लढविण्याची इच्छा दर्शवली असून या निवडणुकीत त्यांना पक्षातर्फे तिकीट मिळावे अशी आशा त्यांनी व्यक्त केली आहे. पक्षासाठी रात्रंदिवस काम करणाऱ्या



पक्षाचे निष्ठावान प्रामाणिक एकनिष्ठ कार्यकर्त्याला तिकीट मिळाले नाही तर ते कार्यकर्त्याचा अपमान होईल, सर्वसामान्य एकनिष्ठ व प्रामाणिक कार्यकर्त्याला डावलल्यासारखे होईल त्यामुळे समाधान म्हात्रे यांना जिल्हा परिषद सदस्य निवडणुकीसाठी पक्षातर्फे उमेदवारी मिळावी, तिकीट मिळावे असे मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी तसेच उरणच्या जनतेने केली आहे. आजपर्यंत समाधान म्हात्रे यांनी जनतेसाठी अनेक विकास कामे केले आहेत. ग्रामपंचायत सदस्य, उपसरपंच असताना गावात अनेक विकास कामे केली तर पक्षाच्या विविध पदावर कार्यरत असताना अनेकांना मदत करून त्यांचे प्रश्न सोडविले आहेत .समाधान म्हात्रे यांना प्रशासकीय कामांचा चांगला उत्तम दांडगा अनुभव आहे.त्यांचा जनतेशी दांडगा जनसंपर्क आहे.गोरगरिबांच्या अनेक प्रश्न त्यांनी सोडविले आहेत. भविष्यात पाण्याचा प्रश्न रस्त्याचे प्रश्न,विजेचे प्रश्न, बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्याचा त्यांचा मानस आहे त्या दृष्टीने कार्यरत राहण्याचा त्यांनी संकल्प केला आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी किंवा महाविकास आघाडी आता समाधान म्हात्रे यांना न्याय देते कि त्यांच्यावर अन्याय करते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# भिगवण कला महाविद्यालयात पत्रकारांचा सन्मान; समाजप्रबोधनात पत्रकारांची भूमिका महत्त्वाची–प्राचार्य डॉ.तानाजी मगर

### पत्रकार दिनानिमित्त पंचक्रोशीतील पत्रकारांचा गौरव कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय भिगवण येथे सन्मान सोहळा संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**भिगवण । प्रतिनिधी**

इंदापूर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भिगवण यांच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त भव्य पत्रकार सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भिगवण व पंचक्रोशीतील सर्व पत्रकारांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तानाजी मगर होते. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार भरत मल्लाव, भिगवण मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष आकाश पवार, भिगवण पत्रकार संघाचे अध्यक्ष विजयकुमार गायकवाड, जनसेवा पत्रकार संघाचे अध्यक्ष बबनराव धायतोंडे, तसेच प्राध्यापक संदीप साठे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. तानाजी मगर म्हणाले, पत्रकार हा समाजाचा आरसा असून शासन व समाजव्यवस्था यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. समाजातील घडामोडी, नागरिकांच्या समस्या व प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम पत्रकार करीत असतात. शैक्षणिक संस्थांच्या






प्रगतीबरोबरच समाजप्रबोधनातही पत्रकारांचा मोठा वाटा आहे. त्यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावाही यावेळी मांडला.या कार्यक्रमात भरत मल्लाव, आकाश पवार, विजयकुमार गायकवाड, बबनराव धायतोंडे, नितीन चितळकर, डॉ. काशीनाथ सोलनकर, तुषार क्षीरसागर, महेंद्र काळे, निलेश गायकवाड, अरुण भोई, संजय शिंदे, संतोष सोनवणे, अनिल खाडे, संतोष सवाणे, सागर जगदाळे, योगेश चव्हाण, संतोष पवार, महादेव बंडगर, अमोल कांबळे, निलेश मोरे, सागर घरत, तुषार हगारे, प्रवीण वाघमोडे, गोरख पोंदकुले आदी पत्रकारांचा प्राचार्य डॉ. तानाजी मगर, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.यावेळी भरत मल्लाव, डॉ. काशीनाथ सोलनकर, निलेश गायकवाड, तुषार क्षीरसागर, महादेव बंडगर यांनी मनोगत व्यक्त केले. पत्रकारितेतील बदल, येणाऱ्या अडचणी, समाजातील वास्तव मांडण्याची जबाबदारी व शैक्षणिक संस्थांशी असलेले नाते यावर त्यांनी विचार मांडले तसेच महाविद्यालयाने दिलेल्या सन्मानाबद्दल आभार मानले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. महादेव वाळुंज यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. प्रशांत चवरे यांनी केले तर आभारप्रदर्शन डॉ. बाळासाहेब खरात यांनी केले.कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साकळाई पाणी योजनेच्या माध्यमातून लाभक्षेत्रातील गावे दुष्काळमुक्त करणार–पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील

**दैनिक वादळ वार्ता**
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

साकळाई पाणी योजनेच्या कामाची सुरुवात येत्या पंधरा दिवसात करण्यात येईल. या पाणी योजनेच्या माध्यमातून लाभक्षेत्रातील गावांना दुष्काळमुक्त करण्यात येईल, अशी ग्वाही जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.अहिल्यानगर तालुक्यातील सारोळा कासार येथे सुमारे ३ कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमास दिलीप भालसिंग, उद्योजक दिलीप दाते, सरपंच सौ. आरती कडूस, रविंद्र कडूस, सौ. योगिता निंभोरे, किरण साळवे, संतोष खोबरे, दादाभाऊ चितळकर, रंगनाथ निमसे आदी उपस्थित होते.पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, या भागातील लोकांना अनेक वर्षे पाण्याची प्रतीक्षा करावी लागली. साकळाईच्या सर्व कामांना शासनाने मंजुरी दिली असून, पुढील पंधरा दिवसांत कामाला सुरुवात करण्याच्या सूचना विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. साकळाईच्या कामामुळे सारोळा कासार येथील २९५ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येऊन १३ बंधाऱ्यांच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.केंद्र सरकारने नव्याने आणलेल्या विविध योजनांच्या माध्यमातून प्रत्येक गावाला निधी उपलब्ध होत असून, ग्रामपंचायतीच्या माध्यमातून



गावाच्या विकासाचे नियोजन करताना रोजगार निर्मितीला प्राधान्य देण्यात आले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजनांचा लाभ विविध समाजघटकांना मिळत आहे. सुरू केलेली एकही योजना बंद नाही. कोविडनंतर सुरू झालेल्या मोफत धान्य योजनेची मुदत वाढविण्यात आली असून, 'लाडकी बहीण' योजनाही सुरू राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.ते पुढे म्हणाले, कुकडी कालव्याच्या कामांना ४०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असून, कालव्याची कामे मार्गी लागल्यानंतर आवर्तनाचा चाळीस दिवसांचा कालावधी कमी होईल. शेवटच्या गावाला पाणी मिळावे म्हणून पाईपलाईनद्वारे पाणी देण्याचा विचार जलसंपदा विभाग करीत आहे. जिल्ह्यात रोजगार निर्मितीला प्राधान्य देण्यात येत असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली येत असलेल्या गुंतवणुकीचा फायदा जिल्ह्याला कसा होईल, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. संरक्षण उत्पादनाचे केंद्र म्हणून आपला जिल्हा नावारूपाला येईल. दळणवळणाची साधने उपलब्ध होत आहेत. छत्रपती संभाजीनगर – पुणे ग्रीन फिल्ड मार्ग होत आहे. जिल्हा मोठ्या औद्योगिक नगरांना जोडला जात असल्याने, जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाचे काम युवकांच्या भवितव्याच्या दृष्टीने करायचे आहे. असेही त्यांनी सांगितले.घोसपुरी येथे माजी सैनिकांनी उभारलेल्या कमानीचे लोकार्पणही मंत्री विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. सैनिकांच्या त्यागाला समाज विसरून जातो, अशी खंत व्यक्त करून 'राष्ट्र प्रथम' ही भावना असली पाहिजे, असे ते म्हणाले. जिल्ह्यातील सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, अकोला जिल्ह्यात उभारण्यात आलेल्या स्मारकाप्रमाणे आपल्या जिल्ह्यातही स्मारक उभारण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

# गरजूच्या चेहऱ्यावर हास्य;अमर परदेशी,यांचा स्तुत्य उपक्रम

**दैनिक वादळ वार्ता**
**दौंड । प्रतिनिधी**

वाढदिवस म्हणजे केवळ केक कापणे किंवा औपचारिक समारंभ नव्हे, तर समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देण्याची संधी असते, हे अमरभैय्या परदेशी यांनी आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवले. त्यांच्या वाढदिवसानिमित्त खडकी गावातील अपंग नागरिक वाल्मिक जगताप यांना आवश्यक असलेली व्हीलचेअर (अपंग खुर्ची) भेट देण्यात आली.

अपंगत्वामुळे हालचालींवर मर्यादा आलेल्या वाल्मिक जगताप यांच्यासाठी ही व्हीलचेअर नव्या आशेचा किरण ठरली आहे. यावेळी बोलताना अमरभैय्या परदेशी म्हणाले,

गरजू व्यक्तीच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान हेच माझ्या वाढदिवसाचे खरे गिफ्ट आहे.

या सामाजिक उपक्रमाला ग्रामस्थ, महिला भगिनी




तसेच युवक वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. वाढदिवसाचे औचित्य साधून समाजोपयोगी कार्य केल्यामुळे अमरभैय्या परदेशी यांनी तरुण पिढीसमोर आदर्श निर्माण केल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.दिखाव्यापेक्षा माणुसकीला प्राधान्य देणाऱ्या या उपक्रमामुळे खडकी परिसरात अमरभैय्या परदेशी यांच्या सामाजिक कार्याची पुन्हा एकदा सकारात्मक दखल घेण्यात आली आहे.

# केबीपीमध्ये सायबर गुन्हेगारी विषयावर मार्गदर्शन

**दैनिक वादळ वार्ता**
**नवी मुंबई । प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये आर्थिक गुप्तवार्ता पथक गुन्हे शाखा नवी मुंबई यांच्यावतीने सायबर गुन्हेगारी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रो. डॉ. राजेश्री घोरपडे उपस्थित होत्या.सहायक पोलीस निरीक्षक श्रीनिवास तुंगेनवार यांनी दैनंदिन जीवनात सातत्याने होणाऱ्या आर्थिक फसवणुकीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी विविध क्षेत्रात होणारी ऑनलाईन फसवणूक व ग्राहकांचे होणारे नुकसान विविध उदाहरणांच्या माधमातून विद्यार्थ्यांना पटवून सांगितले. तसेच भविष्यकाळात आपली आर्थिक फसवणूक होऊ नये. यासाठी कोणती काळजी घेतली पाहिजे. यावरही भाष्य केले. कुठल्याही एजन्सीला माहिती देताना



आपले आधारकार्ड, खातेनंबर व ओटीपी नंबर देता कामा नये. तसेच अमिषाला किंवा लोभाला बळी पडता कामा नये. कोणताही ऑनलाईन व्यवहार करताना खूप काळजी घेणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलीस विभागातील रवींद्र वंजारी यांनी केले तर उपस्थितांचे आभार लेफ्टनंट सारंग भागवत यांनी मानले. कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेतील सर्व विद्यार्थी व युनिटप्रमुख प्रा.नितीन गमरे उपस्थित होते.

# रुग्णांवर वेळेत, दर्जेदार उपचार करण्यासाठी तातडीने उपाययोजना करा

## खा.बजरंग सोनवणे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना;अंबाजोगाई वैद्यकीय महाविद्यालयात अभ्यागत समितीची सविस्तर बैठक

दैनिक वादळ वार्ता
**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई येथे अभ्यागत समितीची बैठक खासदार बजरंग सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली आज पार पडली. यावेळी मराठवाड्यातील ग्रामीण व सर्वसामान्य रुग्णांना दर्जेदार, वेळेवर व आधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध करून द्या, अश्या सूचना खा.सोनवणे यांनी दिल्या. या उद्देशाने रुग्णालयातील विविध विभागांच्या कामकाजाचा सखोल आढावा या बैठकीत घेण्यात आला.

बैठकीस अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे, समिती सदस्य माजी आमदार संजय दौंड, राजकिशोर पापा मोदी, वसंत मुंडे, संजीवनी देशमुख, तसेच डॉ.नरेंद्र काळे, अमर देशमुख यांच्यासह रुग्णालयातील विविध विभागांचे प्रमुख व अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत CT Scan तपासणीनंतर रेडिओलॉजिस्टकडून वेळेत अहवाल न मिळाल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांना होणाऱ्या अडचणींबाबत चर्चा झाली. रुग्णालयातील रेडिओलॉजिस्टची मंजूर पदे व प्रत्यक्ष कार्यरत संख्या, त्यांची उपस्थिती व






कामाचे तास यावर स्पष्टता आणण्याच्या सूचना करण्यात आल्या. चठख मशीन कार्यरत असतानाही रुग्णांना दीर्घ प्रतीक्षा यादीला सामोरे जावे लागत असल्याने अपॉईंटमेंट प्रक्रियेत सुधारणा करण्याचे निर्देश देण्यात आले.सुपर स्पेशालिटी विभागातील डॉक्टरांची मंजूर व कार्यरत संख्या, उपलब्ध तज्ज्ञ डॉक्टरांचा प्रभावी वापर, तसेच काही सेवा अपेक्षित क्षमतेने कार्यरत नसल्याबाबतही चर्चा झाली. 2D Ech तपासणीसाठी रुग्णांना खासगी रुग्णालयात पाठवण्याची वेळ येऊ नये, यासाठी आवश्यक मनुष्यबळ व साधनसामग्री उपलब्ध करून देण्याबाबत प्रशासनाला सूचित करण्यात आले. कार्डियोलॉजिस्ट व न्युरोसर्जन यांच्या उपलब्धतेचा आढावा घेऊन त्या सेवा अधिक बळकट करण्यासाठी उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला.याशिवाय दंत महाविद्यालय (Dental College) व नर्सिंग कॉलेज सुरू करण्याच्या प्रस्तावांच्या सद्यस्थितीची माहिती बैठकीत घेण्यात आली. वैद्यकीय शिक्षणाच्या दृष्टीने या प्रस्तावांना गती देऊन भविष्यात अधिक मनुष्यबळ तयार करण्यावर भर देण्यात आला.

ग्रामीण भागातील तसेच संपूर्ण मराठवाड्यातील रुग्णांना त्यांच्या परिसरातच आधुनिक, विश्वासार्ह व दर्जेदार उपचार मिळावेत, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने राबवाव्यात, असे स्पष्ट निर्देश खासदार बजरंग सोनवणे यांनी संबंधित प्रशासनाला दिले. आरोग्यसेवा, वैद्यकीय शिक्षण व संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी आपला सातत्यपूर्ण पाठपुरावा पुढेही सुरूच राहील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# तळोदा येथील भाईसाहेब महाजन हायस्कूलच्या ५ स्काउट विद्यार्थ्यांची राज्य पुरस्कार चाचणीसाठी निवड

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

अ. शि. मंडळ धुळे संचलित, प्राचार्य भाईसाहेब गो.हू. महाजन न्यू हायस्कूल व श्री शिवराम लक्ष्मण माळी कनिष्ठ महाविद्यालय, तळोदा येथील विद्यार्थ्यांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. महाराष्ट्र राज्य भारत स्काउट्स आणि गाईड्सतर्फे आयोजित नाशिक विभागीय 'राज्य पुरस्कार' चाचणी शिबिरासाठी या शाळेतील ५ स्काउट विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.हे महत्त्वाचे चाचणी शिबीर दिनांक १४ ते १७ जानेवारी २०२६ या कालावधीत हस्ती पब्लिक स्कूल, दोंडाईचा (जि. धुळे) येथे पार पडत आहे. या शिबिरासाठी विद्यार्थ्यांसोबत त्यांचे मार्गदर्शक शिक्षक स्काउटर संकेत



माळी हे उपस्थित राहणार आहेत.

राज्य पुरस्कारासाठी होणारी ही चाचणी अत्यंत शिस्तबद्ध आणि सर्वंकष स्वरूपाची असते. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचे परीक्षण केले जाणार आहे:बौद्धिक चाचणी: स्काउट वचन, नियम, इतिहास, प्रार्थना, झंडागीत व राष्ट्रगीत.कौशल्य चाचणी: विविध प्रकारच्या गाठी होकायंत्राचा वापर, प्रथमोपचार, अंदाज घेणे आणि नकाशा वाचन. प्रात्यक्षिक: संदेशन आणि वर्षभरातील उपक्रमांचे सर्व 'लॉगबुक' परीक्षण इत्यादी. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल अ. शि. मंडळ धुळे संस्थेच्या अध्यक्षा मंगलताई महाजन व स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन तथा कॉलेज ट्रस्टचे संचालक अरुणकुमार महाजन यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.शाळेचे प्रेरणादायी मुख्याध्यापक डॉ.अमरदीप महाजन यांनी या यशामुळे शाळेच्या शिस्तीत आणि मानात भर पडली आहे, अशा शब्दांत विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी उपमुख्याध्यापक एस.एस.सूर्यवंशी, पर्यवेक्षक पी.आर.वळवी, पर्यवेक्षक ए.आर. सूर्यवंशी आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.या निवडीमुळे संपूर्ण तळोदा तालुक्यातून या पाच विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे विशेष अभिनंदन होत आहे.

# तळोदा तालुक्यात काँग्रेस-भाजप ला खिंडार; रांझणीतील असंख्य कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा तालुक्यातील रांझणी येथे १८ जानेवारी रोजी राजकीय मोठी उलथापालथ पाहायला मिळाली. माजी मंत्री पद्माकर वळवी यांचे विश्वासू सहकारी जालमसिंग गावित आणि अनिल चव्हाण यांच्यासह रांझणी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच, विद्यमान सदस्य आणि असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष डॉ. अभिजित मोरे आणि तळोद्याचे योगेश चौधरी यांच्या नेतृत्वाखाली हा सोहळा पार पडला. यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना जिल्हाध्यक्ष डॉ.अभिजित मोरे यांनी काँग्रेसवर निशाणा साधला. ते म्हणाले की, नंदुरबार जिल्ह्यात काँग्रेसची निवडणूक लढवण्याची मानसिकता आता पूर्णपणे संपलेली आहे. काँग्रेस नेतृत्वाने आपल्या निष्ठावान कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडले आहे. यामुळेच शिव, शाहू, फुले आणि आंबेडकर यांच्या विचारधारेवर विश्वास ठेवणारा सामान्य माणूस आणि कार्यकर्ता राष्ट्रवादी काँग्रेसकडे आशेने पाहत आहे.

या पक्षप्रवेश सोहळ्यात भाजपचे ग्रामपंचायत सदस्य धनराज मराठे यांच्यासह अनेक मान्यवरांनी राष्ट्रवादीचे घड्याळ हातावर बांधले. प्रवेश करणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने जालमसिंग गावित,अनिल चव्हाण,गणेश बोराणे,ज्ञानेश्वर मराठे,मुरलीधर कापसे,तानका पाडवी,भबुता मुलवी,सुकलाल पाडवी,रमण पाडवी,परशराम ठाकरे,रामसिंग पाडवी,विजयसिंग पाडवी,जालमसिंग पाडवी,नागेश पाडवी किरण पाडवी यांच्या नावाचा समावेश आहे. या मोठ्या पक्षप्रवेशामुळे तळोदा तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद वाढली असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हे पाऊल महत्त्वाचे मानले जात आहे.

# अखेर वंचित बहुजन आघाडीच्या लढ्याला यश

## केज पंचायत समितीत बायोमेट्रिक प्रणाली कार्यान्वित,प्रदिप गायकवाड यांच्या दोन महिन्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील नागरिकांच्या कामकाजात होत असलेली दिरंगाई, अधिकारी वेळेवर कार्यालयात न येणे, नियमित हजेरी न लावणे, आठवड्याच्या सह्या एकदाच करून निघून जाणे,अवघ्या एक तास कार्यालयात बसणे अशा विविध कारणांमुळे पंचायत समिती केज येथे नागरिकांची मोठ्या प्रमाणात हेळसांड होत होती.या गंभीर प्रश्ना विरोधात वंचित बहुजन आघाडीने आक्रमक भूमिका घेत तालुका स्तरावर आंदोलन छेडले होते.पंचायत समितीतील अधिकारी वेळेवर उपस्थित राहत नसल्याने सामान्य नागरिकांना वारंवार फेऱ्या माराव्या लागत असल्याचा आरोप करत वंचित बहुजन आघाडी केज च्या कार्यकर्त्यांनी पंचायत समिती प्रशासनाला निवेदन दिले होते.तसेच, अधिकाऱ्यांच्या रिकाम्या खुर्च्यांना हार घालून निषेध व्यक्त




करण्यात आला होता.या संपूर्ण प्रकरणाचा सातत्याने दोन महिने पाठपुरावा वंचित बहुजन आघाडीचे तालुका प्रवक्ते प्रदीप गायकवाड यांनी केला.जर पंचायत समितीत तात्काळ बायोमेट्रिक प्रणाली बसवली नाही,तर अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे फासू,असा इशारा ही वंचितच्या वतीने देण्यात आला होता.अखेर या लढ्याला यश येत पंचायत समिती केज येथे बायोमेट्रिक हजेरी प्रणाली बसवण्यात आली आहे.त्यामुळे यापुढे अधिकारी व कर्मचारी वेळेवर उपस्थित राहतील आणि नागरिकांच्या कामकाजात पारदर्शकता येईल,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.वंचित बहुजन आघाडीच्या या आंदोलनामुळे प्रशासनाला जाग येत नागरिकांना न्याय मिळाल्याची भावना तालुक्यातील नागरिकां तून व्यक्त होत आहे. दरम्यान या प्रकरणी पत्रकार बांधवानी बातम्या लावुन प्रसिद्धी दिली होती मागणी पूर्णत्वाला गेल्याने समाधान व्यक्त केले जात आहे

# केंद्रीय राखीव पोलिस दलात भरती झाल्याने गावकऱ्यांनी काढली वाजत गाजत मिरवणूक

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

केंद्रीय राज्य राखीव दलात निवड झाल्याच्या आनंदात केज तालुक्यातील साळेगाव येथील अजय इंगळे यांची वाजत गाजत मिरवणूक काढून गावकऱ्यांनी भव्य नागरी सत्कार केला.

या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील साळेगाव येथील सुधाकर उर्फ बाळासाहेब इंगळे यांचा मुलगा अजय इंगळे हा केंद्रीय राखीव पोलिस दलात भरती झाला आहे. त्याच्या या यशाबद्दल साळेगाव येथे त्याच्या जन्मगावात वाजत गाजत व गुलाल उधळून मिरवणूक काढून भव्य नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी अजय इंगळे यांनी यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या सत्कार समारंभाला सरपंच कैलास जाधव, उपसरपंच



गणेश गालफाडे, सैन्य दलातील सेवानिवृत ऑनररी कॅप्टन रावसाहेब बचुटे, शिवाजी इंगळे, अमर मुळे, मन्मथ पटणे, अंकुश इंगळे, पुंडलिक पोपळघट, रामेश्वर इंगळे, कमलाकर राऊत, ज्योतिराम बचुटे, रामेश्वर शिंदे बलभीम बचुटे, मधूकर अंधारे, संजय इंगळे, सुधाकर इंगळे, जय जोगदंड, सय्यद अलिपाशा यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# भक्तीचा महाकुंभ आणि स्वच्छतेचा महायज्ञ; याहा मोगी मातेच्या चरणी हजारो भाविकांची 'स्वच्छता सेवा' अर्पण!

## आध्यात्मिक चैतन्य आणि सामाजिक कर्तव्याचा देवमोगरा येथे अभूतपूर्व संगम

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

निसर्गाच्या सानिध्यात वसलेले आणि लाखो आदिवासी बांधवांचे श्रद्धास्थान असलेल्या गुजरात राज्यातील सागबारा तालुक्यातील देवमोगरा येथील याहा मोगी माता धाम येथे भक्तीचा एक वेगळाच रंग पाहायला मिळाला. केवळ पूजा-अर्चा आणि नैवेद्य म्हणजे भक्ती नव्हे, तर परिसर स्वच्छ ठेवून मातेची सेवा करणे हीच खरी भक्ती आहे, हा संदेश आदिवासी रूढी परंपरा जाणीव जागृती संस्था, विसरवाडी यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिला. संस्थेच्या वतीने आयोजित या भव्य स्वच्छता महायज्ञात महाराष्ट्र, गुजरात व मध्यप्रदेशातील हजारो भाविकांनी श्रद्धेने सहभाग घेतला.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी याहा मोगी माता मंदिर परिसरात स्वच्छतेचा जागर करण्यात आला. ढोल-वाद्यांच्या गजरात आणि मातेच्या जयघोषात भाविकांनी केवळ रस्तेच नव्हे, तर सार्वजनिक ठिकाणे आणि मंदिर परिसर स्वच्छ केला. श्रद्धेच्या या महाकुंभात सहभागी झालेल्या भाविकांच्या चेहऱ्यावर सामाजिक ऋणाची जाणीव स्पष्टपणे दिसत होती. स्वच्छता हीच खरी ईश्वर सेवा या भावनेने भारावलेल्या हजारो हातांनी देवमोगरा नगरी स्वच्छतेच्या तेजाने उजळून टाकली.


या मंगलमयी कार्याचे यशस्वी नियोजन आदिवासी रूढी परंपरा जाणीव जागृती संस्थेचे अध्यक्ष ईश्वर गावित, उपाध्यक्ष जीवन गावित, सचिव बाबुराव वसावे, तसेच किशोर वसावे, जय गावीत, अनिल वळवी, देवजीसेठ डाबरी, प्रताप वळवी केलपाडा आणि जयवंत गावित यांनी केले.यावेळी याहा मोगी माता धामचे ट्रस्टी केसरसिंग वसावा, जगदीशभाई देवमोगरा, राजू सर गव्हाळी, ड. सत्यानंद गावीत (वडसत्रा), संतोषभाई वळवी (कडवामुहू), विनोदभाई वळवी (पूरआंबी) यांच्यासह संस्थेचे असंख्य सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.स्वच्छता सेवा पार पडल्यानंतर सेवाभावी वृत्तीने सहभागी झालेल्या सर्व भाविकांसाठी जयराम गावित (वडसत्रा) व प्रताप गावित (जामनपाडा) आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सात्त्विक व पौष्टिक महाप्रसादाची व्यवस्था केली होती. उचीसेवडी, पिंपळा, वडसत्रा व महालकडू येथील पारंपारिक ढोलपथकांनी आपल्या वाद्यांच्या गजराने संपूर्ण परिसरात चैतन्य निर्माण केले.

श्रद्धा, एकता आणि सामाजिक जबाबदारीचा हा त्रिवेणी संगम पाहून उपस्थित भाविकांनी समाधान व्यक्त केले. शेवटी, मातेच्या चरणी सेवा रुजू करणाऱ्या सर्व भाविकांचे आणि कार्यकर्त्यांचे संस्थेच्या वतीने आभार मानण्यात आले.



## श्री.४२० सौरभ कुलकर्णी प्रकरण!

# एमडीला डमिशन मिळवून देतो म्हणून केली ७० लाखाची फसवणूक!



दैनिक वादळ वार्ता

**गौतम बचुटे । केज**

वैद्यकीय शिक्षणासाठी पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणासाठी मॅनेजमेंट कोट्यातून प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखवून महाराष्ट्रासह अनेक राज्यातील विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांची फसवणूक करून त्यांच्याकडून कडून लाखो रु. उकळणाऱ्या महाठक श्री .४२० सौरभ कुलकर्णी याला दि. १३ जानेवारी २०२६ रोजी बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यातील डॉ. तोंडे यांची फसवून करून आठ लाख रु. उकळल्या प्रकरणी केज उपविभागाचे सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकटराम यांच्या पथकातील पोलिस उपनिरीक्षक सय्यद जावेद कराडकर, पोलिस उपनिरीक्षक अमिरोद्दीन इनामदार आणि अनिल मंदे यांनी कराड येथून त्याच्या मुसक्या आवळल्या आहेत.

त्या श्री. ४२० सौरभ कुलकर्णी यांचे अनेक कारनामे उघड होत आहेत. आता या नागपूर येथील महाठकाने नागपूर येथील बांधकाम व्यावसायिक सतीश गुरुमुखदास लालवाणी यांची एम.बी बी एस झालेली मुलगी डॉ. दिव्या सतीश लालवाणी हिला बेंगलोर किंवा कर्नाटक येथील वैद्यकीय कॉलेज मध्ये रद्द झालेल्या जागेवर त्वचा रोग शास्त्राच्या एम डी या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी डमिशन मिळवून देतो म्हणून दि. २८ ऑक्टोबर २०२३ ते १४ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत ७० लाख रु. उकळले. मात्र त्या नंतर डॉ. दिव्या लालवाणी हिला तिचे नाव मॅनेजमेंट कोट्यातील संभाव्य प्रवेश यादीत नसल्याने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्या नंतर डॉ. दिव्या हिचे वडील आणि नागपूर येथील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक सतीश लालवाणी यांनी त्याला पैसे परत मागितले परंतु त्यांनी पैसे परत दिले नाहीत आणि पैसे परत देण्यास टाळाटाळ केली. म्हणून

**भाग ३**

डॉ. दिव्या लालवानी यांचे वडील सतीश लालवाणी यांनी दि. १५ नोव्हेंबर २०२४ रोजी नागपूर शहरातील जरीपटका पोलिस ठाण्यात सौरभ कुलकर्णी आणि त्याचे साथीदार यांनी वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या पदव्युत्तर परीक्षेसाठी प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखवून ७० लाख रु. ची फसवणूक केल्याच्या तक्रार दाखल केली. त्या तक्रारी नुसार सौरभ कुलकर्णी वय (३८ वर्ष) आणि त्याचे बेंगलोर येथील साथीदार के कृष्णमूर्ती वय (५० वर्ष), अनिस नुन्ना वय (३६ वर्ष) आणि जुनेद वय (४५ वर्ष) या चौघा ठका विरुद्ध नागपूर शहरातील जरीपटका पोलिस ठाण्यात गु. र. नं. ७७१/२०२४ भा. दं. वि. ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.त्याचा तपास पोलिस उपनिरीक्षक संजय उदगीरकर हे करीत आहेत.



## चांगले रस्ते,शाळा,शुध्द पाणी ही गावाच्या विकासाची ओळख: खा.बजरंग सोनवणे

### टाकळी (ता.केज) येथे विविध विकासकामांचे लोकार्पण

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

चांगले रस्ते, शुद्ध पाणी, वीजपुरवठा व बालकांसाठी अंगणवाडी सुविधा, दर्जेदार शाळा या गावाच्या खऱ्या विकासाची ओळख असल्याचे प्रतिपादन खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केले.तालुक्यातील टाकळी (ता.केज) येथे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या विविध विकासकामांचे उद्धाटन खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. यावेळी ते बोलत होते. गावाच्या मूलभूत गरजा पूर्ण करणारी तसेच भविष्यातील पिढीसाठी दिशा देणारी ही कामे टाकळीच्या प्रगतीच्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा असल्याचे खा.सोनवणे यांनी यावेळी सांगितले. या प्रसंगी टाकळी ते पाचीअंबा वस्ती रस्त्याचे उद्धाटन करण्यात आले असून, या मार्गामुळे



दळणवळण सुलभ होणार आहे. तसेच गावअंतर्गत स्मशानभूमीचा विकास, दलितवस्ती व कदमवाडी येथे अंगणवाडी खोली बांधकाम, शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी पाणी फिल्टर बसविणे, गावासाठी २४ तास गावठाण लाईट फिटर सुविधा सुरू करण्यात आली आहे. इजगर लवन तलाव येथे नवीन उफेज रोहित्र (डी.पी.) बसविणे, लक्ष्मी आई मंदिर परिसरात सभा मंडप बांधकाम, मैनाजीच्या वस्तीला जाणारा सिमेंट रस्ता तसेच केज ते धनवाडा (भगवानबाबा वस्ती) रस्त्याचे मजबुतीकरण व खडीकरण अशी विविध कामे लोकार्पित करण्यात आली. या विकासकामांमुळे महिला, शेतकरी बांधव, विद्यार्थी तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.उद्धाटनप्रसंगी ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक, माता-भगिनी, युवक कार्यकर्ते व स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

## अक्कलकुवा अक्राणी विधानसभा मतदार संघाच्या सर्वांगीण विकासा साठी आपण प्रयत्नशील असु-आमदार आमश्या पाडवी यांनी केले

दैनिक वादळ वार्ता

**रविंद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

सन २०२४/२५ या आर्थिक वर्षात वार्षिक नावीन्य पुर्ण योजनेतुन पाणी टंचाई निवारणासाठी अक्कलकुवा तालुक्यातील ग्रामपंचायतींना मंजूर झालेल्या ३० टँकरचे वितरण आमदार आमश्या पाडवी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार आमश्या पाडवी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना बोलत होते. अक्कलकुवा तालुक्यातील अनेक गावात पाणी टंचाई असल्याने पाणी टंचाई निवारणासाठी आमदार आमश्या पाडवी यांनी वार्षिक नाविन्यपुर्ण योजनेतून पाण्याच्या टँकरची मागणी केली व त्या अनुषंगाने पालकमंत्री ना. माणिकराव कोकाटे यांनी ३० टँकर मंजुर केले होते. त्याचे वितरण करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेनेचे सह संपर्क प्रमुख लक्ष्मण वाडिले तालुका प्रमुख तुकाराम वळवी, ललित जाट, राजेंद्र वसावे, सरपंच वसंत वसावे, उषा बोरा, विनोद वळवी, आनंद



वसावे, इमरान मक्राणी, हिरामण पाडवी, रोहीत चौधरी, दुर्गा पाडवी, कंचन पाडवी, रवी पाडवी आदी उपस्थित होते. याप्रसंगी लक्ष्मण वाडिले, हिरामण पाडवी, ललित जाट, कंचन पाडवी, ज्योती तडवी, दुर्गा पाडवी, रवी पाडवी आदींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रविंद्र गुरव यांनी तर उपस्थितांचे आभार सुधीरकुमार ब्राम्हणे यांनी मानले. कार्यक्रमाला सरला वळवी, निता माळी, संध्या पाटील, छाया वळवी, मथुराबाई पाडवी, आदी उपस्थित होते. पाणी टंचाईच्या निवारणासाठी ग्रामपंचायतींना पाण्याचे टँकर मिळाल्याने गावांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## विवेक यादव यांचा सत्कार केले डॉ.आंबेडकरांना अभिवादन

दैनिक वादळ वार्ता

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकेत मोठ्या मताधिक्याने निवडून आलेले नवनिर्वाचित नगरसेवक विवेक यादव यांचा जगन्नाथ सकट समाजसेवा भावी संस्थेच्या वतीने सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

त्यानंतर अरोरा टॉवर, कॅम्प येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास नगरसेवक विवेक यादव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. सामाजिक समता, न्याय व लोककल्याणाच्या विचारांना पुढे नेण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.या कार्यक्रमास शिवराम तरुण मंडळाचे अध्यक्ष आसिफ शेख, जगन्नाथ सकट समाजसेवा भावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष इंद्रजीत सकट, सुरेश रासगे, सनी सोनवणे, बाळासाहेब जाधव, आख्तर शेख, रोहित साळवे, किशोर गायकवाड, अश्रू खवळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडला.



## एस जे व्ही एन कंपनीच्या सी एस आर निधीतून तळोदा परिसरात विकासाचा प्रकाश; २९ हायमस्ट दिवे व रुग्णवाहिकेचे लोकार्पण

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

आदिवासी बहुल भागातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी कॉर्पोरेट क्षेत्राचे योगदान महत्त्वपूर्ण ठरत आहे. श्री साईनाथ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. शशिकांत वाणी यांच्या विशेष पाठपुराव्यातून, एस जे व्ही एन कंपनीच्या 'सीएसआर' फंडातून तळोदा तालुक्यातील विविध गावांमध्ये २९ सोलर हायमस्ट दिवे आणि एक रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधांचे लोकार्पण नुकतेच रांझणी येथे संपन्न झाले.

रांझणी (ता. तळोदा) येथे श्री साईनाथ शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित तीन दिवसीय 'कर्मण्य महोत्सव' मोठ्या उत्साहात सुरू आहे. या महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सोलर हायमस्ट दिवे व रुग्णवाहिकेचा लोकार्पण सोहळा पार



पडला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते फीत कापून रुग्णवाहिकेचे लोकार्पण करण्यात आले. रांझणी पाठोपाठ प्रतापपूर आणि कोठार येथेही सोलर हायमस्ट दिव्यांचे लोकार्पण करण्यात येऊन गावे प्रकाशमान करण्यात आली.

यावेळी बोलताना एस जे व्ही एन कंपनीचे जनरल मॅनेजर विक्रम मौदगिल म्हणाले की, दुर्गम आणि आदिवासी भागात रुग्णवाहिका व सौर पथदिवे उपलब्ध करून दिल्याने कंपनीचा सीएसआर फंड खऱ्या अर्थाने सत्कारणी लागला आहे. त्यांनी भविष्यातही स्वच्छता आणि पर्यावरण रक्षणासाठी कंपनीमार्फत सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. शशिकांत वाणी यांनी सांगितले की, कंपनीच्या धोरणानुसार कार्यक्षेत्राबाहेर निधी देण्यास मर्यादा असतात. मात्र, या भागातील गरज लक्षात घेऊन विशेष बाब म्हणून नियमांच्या चौकटीतून हा मार्ग काढण्यात आला. यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांची आरोग्य सेवा आणि गावांमधील सुरक्षेचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

या सोहळ्याला एस जे व्ही एन कंपनीचे डेप्युटी जनरल मॅनेजर नायाब अहमद जैन, अभय सोनटक्के, संस्थेचे सचिव गुलाबराव चव्हाण, आदित्य मालपुरे, रवींद्र वाणी, जगन मराठे, डॉ. बरखा गढपाले, कोठारचे सरपंच मोतीलाल पाडवी, पंकज पावरा यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नंदुरबारची मोहोर सातासमुद्रापार! अक्कलकुव्याचे डॉक्टर जसपालसिंग वळवी श्रीलंकेत 'हिंदी गौरव' पुरस्काराने सन्मानित

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

नंदुरबार जिल्ह्याच्या दुर्गम भागातील शैक्षणिक गुणवत्तेचा डंका आता सातासमुद्रापार घुमला आहे. अक्कलकुवा तालुक्यातील अश्वत्थामा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर जसपालसिंग केसरसिंग वळवी यांना श्रीलंकेची राजधानी कोलंबो येथे अत्यंत मानाच्या भारत-श्रीलंका हिंदी गौरव सम्मान पुरस्काराने गौरवण्यात आले. आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळालेल्या या यशामुळे संपूर्ण नंदुरबार जिल्ह्याचे नाव उंचावले असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.जागतिक व्यासपीठावर गौरव कोलंबो येथील स्वामी विवेकानंद केंद्र, भारतीय उच्चायोग आणि केलणीय विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने ९ ते १३ जानेवारी २०२६ या कालावधीत 'विश्व हिंदी संमेलन' पार पडले. या जागतिक सोहळ्यात भारतीय उच्चायुक्त



संतोष झा, उपायुक्त सत्यांजल पांडे आणि श्रीलंकेचे शिक्षण मंत्री डॉक्टर मधुरा सेनेविरत्ने यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉक्टर वळवी यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाचे औचित्य साधून उच्चायुक्त संतोष झा यांनी हिंदी भाषेच्या जागतिक प्रभावावर भाष्य केले. हिंदी केवळ भाषा नसून ती विविध देशांच्या संस्कृतीला जोडणारा मजबूत दुवा असल्याचे त्यांनी सांगितले. अशा प्रतिष्ठीत व्यासपीठावर महाराष्ट्रातून आणि विशेषतः नंदुरबारसारख्या आदिवासी बहुल जिल्ह्यातून प्रतिनिधित्व करत डॉक्टर वळवी यांनी आपली ओळख निर्माण केली आहे.

स्वामी विवेकानंद केंद्राचे संचालक प्रोफेसर डॉक्टर अंकुरण दत्ता, केलणीय विद्यापीठाच्या प्रोफेसर डॉक्टर अतिला कोतलावल आणि हिंदी विभागाध्यक्ष प्रा. डॉक्टर सुभाषिनी रत्ननायके यांच्या हस्ते डॉक्टर वळवी यांना सन्मानित करण्यात आले. या सोहळ्याला देशातील उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान आणि महाराष्ट्रातील नामवंत साहित्यिक व विचारवंत उपस्थित होते.

डॉक्टर जसपालसिंग वळवी हे ब्रिटिश अंकुशविहीर येथील अश्वत्थामा माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या या यशाबद्दल विद्या विकास संस्थेचे अध्यक्ष नागेश पाडवी, उपाध्यक्ष किर्तीकुमार पाडवी, सचिव प्रभाकर उगले यांच्यासह अक्कलकुवा तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत नरवडे, मुख्याध्यापिका हंसाबेन पाडवी,उपमुख्याध्यापक एनआर.कोते , पर्यवेक्षक धनंजय मराठे.विनोद पाटील,किसन पाडवी, तुषार नाईक,प्रकाश तडवी ,पत्रकार अनिल जावरे,योगेश्वर बुवा,निलेश बोराणे, पंकज मराठे , राहूल चव्हाण, पत्रकार मधुकर कापुरे, प्रभू तडवी,गंगाराम वसावे, छोटू नवाळे , आदींनी डॉक्टर वळवींचे अभिनंदन केले.त्याचबरोबर जिल्ह्यातील पत्रकार व शिक्षण प्रेमींनी त्यांचे कौतुक केले आहे.

नंदुरबारच्या मातीतील शिक्षकाने आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणे, ही संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077